


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३२८ वा गुरूवार दि २६ मार्च २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# विकेट पाडण्याचा खेळ, झिरवाळांचं मंत्रिपद घालवण्यासाठी माजी मंत्र्याचा सहभाग; वडेट्टीवारांचा गंभीर आरोप

**वृत्तसंस्था/ नागपूर**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्याशी संबंधित प्रकरण चर्चेत असतानाच राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याशी संबंधित कथित व्हायरल व्हिडिओमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. यावरून आता काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी गंभीर आरोप करत सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. या संपूर्ण प्रकरणामागे राजकीय स्पर्धा आणि पदासाठी सुरू असलेली अंतर्गत चढाओढ कारणीभूत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, सध्या जे नको आहेत त्यांनाच टार्गेट केले जात आहे. प्रत्येकजण दुसऱ्याची जागा मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे. एका मंत्र्याची विकेट गेली की दुसरा तयारच असतो, आणि त्यालाही बाहेर काढण्यासाठी तिसरा रांगेत उभा असतो. त्यामुळेच अशा प्रकारची प्रकरणे घडत आहेत. पुढे बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, संबंधित प्रकार शासकीय वसतीगृहात घडल्याची माहिती समोर येत आहे. जर शासकीय वस्तीगृहाचा अशा प्रकारे गैरवापर झाला असेल, तर ते अत्यंत गंभीर आहे. अशा पदावर राहून अशा प्रकारचे वर्तन अजिबात योग्य नाही, या पार्श्वभूमीवर झिरवळ यांची विकेट काढतात की त्यांना पुन्हा टीममध्ये ठेवतात याचे उत्तर मुख्यमंत्री देऊ शकतील, असे वडेट्टीवार म्हणाले. व्हायरल होणाऱ्या कथित व्हिडिओवरून टीका करताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नरहरी झिरवळ यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणी केली आहे. ङ्कमंत्री नरहरी झिरवाळांचा आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होणे ही केवळ एक घटना नसून, राज्याच्या राजकारणातील नैतिक अध:पतनाचे ज्वलंत उदाहरण आहे. एक जबाबदार लोकप्रतिनिधी, ज्याच्यावर जनतेचा विश्वास व करदात्यांच्या पैशांची जबाबदारी आहे, त्याच्याकडून अशा प्रकारचे अश्लील व अनैतिक वर्तन होणे अत्यंत संतापजनक आणि



निषेधार्ह आहे. हा प्रकार केवळ व्यक्तीगत मर्यादांचा भंग नाही, तर सार्वजनिक जीवनातील नैतिकतेलाच काळिमा फासणारा असल्याने मुख्यमंत्र्यांनी कोणताही विलंब न लावता झिरवाळ यांची मंत्रिपदावरून तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी सपकाळ यांनी केली आहे.

# मुख्यमंत्री होण्यासाठी भाजपच्या नेत्याने अशोक खरातकडून अघोरी पूजा केलेली; हर्षवर्धन सपकाळांच्या दाव्याने खळबळ

**वृत्तसंस्था/मुंबई**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या प्रकरणात राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असून आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी खळबळजनक आरोप केले आहेत. ङ्कभाजप नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांचे या अशोक खरातसोबत अत्यंत जवळचे संबंध होते. चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्री होण्यासाठी अशोक खरातकडून अघोरी पूजा केल्याची माहिती मिळत आहे, असा दावा सपकाळ यांनी केला आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून अशोक खरात प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. ङ्कसरकारने भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात प्रामाणिकपणे कारवाई केली तर डझनभर मंत्री व दोन डझन अधिकारी जेलमध्ये जातील. अशोक खरातच्या इशानेश्वर मंदिराला देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने २०१८ साली १.५ कोटी रुपयांचा निधी दिला होता. फडणवीसांच्या कार्यालयात त्यावेळी कार्यरत असणारे व आता म्हाडाचे अधिकारी मिलिंद बोरीकर यांचे ही या बाबांशी अत्यंत जवळीकीचे संबंध आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचेही भोंदू सोबत फोटो समोर आले आहेत,असा हल्लाबोल सपकाळ यांनी केला आहे देवेंद्र फडणवीस यांना या प्रकरणाबद्दल आधीच माहिती होती, असा दावाही हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. ङ्कभोंदूबाबाचे कारनामे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना सहा महिन्यांपासून माहीत होते. मुख्यमंत्र्यांच्या आजूबाजूचे लोक, मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांचे अशोक खरातशी संबंध असल्यानेच माहिती मिळूनही त्यांनी काही कारवाई केली नव्हती. पण फडणवीस यांच्या मित्रपक्षातील सहकाऱ्यांनीच त्यांचे मुख्यमंत्रिपद घालवण्यासाठी अशोक खरातकडून तंत्र-मंत्र आणि अघोरी पूजा



केल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी अशोक खरात याच्याविरोधात कारवाई सुरू केली, असा दावा सपकाळ यांनी केला आहे

# वाढता उष्मा आणि किडनीचे आरोग्य



गंबर धनावडे हे सत्तरीतील निवृत्त पोस्टमास्तर. लालबागला मुलांसोबत राहतात. संधिवाताशी संबंधित किडनी विकारासाठी गेल्या तीन वर्षांपासून उपचारासाठी येतात. गेली दोन वर्षे त्यांची तब्येत स्थिर आहे. आजारपणामुळे पूर्वीसारखं नेहमी गावी जाणं होत नाही, अशी खंत ते दरवेळी बोलून दाखवतात. होळीनिमित्त कोकणातील त्यांच्या मूळ गावी देवीची मोठी जत्रा असते. दोन आठवड्यांपूर्वी जवळपास तीन वर्षांनी ते गावी गेले, सर्व आप्तेष्टाच्या गाठीभेटी झाल्या, देवीची जत्रा झाली. चौथ्या दिवशी त्यांच्या मुलाचा फोन आला की बाबांची तब्येत अचानक बिघडलीय, बेडमध्ये हालचाल करण्याइतकेही त्राण शरीरात नाहीत, आम्ही लगेच मुंबईला निघतोय. दोन मिलिग्रॅमच्या आसपास स्थिर असलेला किडनीचे काम दर्शवणारा क्रियाटिनिन हा घटक साडेचारवर गेला होता. शिवाय इतरही अनेक पॅरामीटर्स गडबड होते. तीन दिवस आयसीयूमध्ये उपचार घेऊन ते बरे झाले. सर्व पूर्वपातळीवर आलं असलं तरी, सर्व कुटुंबाच्या सुट्टीचा बेत असा लवकर आटोपता घ्यावा लागला, याची सल मात्र राहिली. केईएम रुग्णालयात किडनी प्रत्यारोपणासाठी देशभरातून रुग्ण येतात. प्रत्यारोपणानंतरही दर दोन-तीन महिन्यांनी ते नियमित तपासणीसाठी येत असतात. दोन वर्षांपूर्वी किडनी प्रत्यारोपण झालेल्या व जळगावला राहणाऱ्या विकासचा फोन आला, की अचानक त्याला भयंकर थकवा आला आहे, रक्तदाब कमी झालाय, शिवाय लघवीचं प्रमाणही कमी झालंय. तिथल्या फिजिशियनकडे प्राथमिक उपचार घेऊन तो तातडीने मुंबईला आला आणि केईएममध्ये किडनी ट्रान्सप्लांट आयसीयूमध्ये दाखल झाला. त्याच्या प्रत्यारोपण केलेल्या किडनीचं कामही कमी झालेलं आढळलं. ट्रान्सप्लांट होऊन दहाहून अधिक वर्षं झाली होती, सर्व सुरळीत चाललेलं असताना अचानक गुंतागुंत का निर्माण झाली, हे आम्ही शोधू पाहत होतो. शरीरातील पाणी अचानक कमी झाल्याची म्हणजेच डिहायड्रेशनची अनेक लक्षणं आढळली. कसलाही रक्तस्राव नाही, जंतुसंसर्ग नाही, जुलाब-उलट्या नाहीत. मग इतकं गंभीर डिहायड्रेशन होऊन किडनीला इजा व्हायचं कारण काय? जळगावजवळ एका गावात रस्त्याच्या कडेला विकासचं किराणा मालाचं दुकान होतं. हे दुकान पक्क्या बांधकामाचं नव्हतं. त्याच्या भिंती आणि छत ॲल्युमिनिअमच्या पत्र्याचं होत. गेले काही दिवस जळगाव आणि परिसरात उष्णतेची लाट आली होती. विकासला नेहमीचं कामं करताना प्रचंड थकवा जाणवत होता, आणि दोन तीन दिवसांनी दवाखान्यात दाखल व्हावं लागलं होत. वातावरणातील उष्णतेचा परिणाम होऊन किडनीचं काम करणं अचानक कमी झालं होतं. विकासच्या केसनंतर आमच्या पुढील एका वर्षात किडनी ट्रान्सप्लांट झालेल्या व विविध भागांतून येणाऱ्या नऊ रुग्णांना अशा प्रकारे वातावरणातील उष्णतेमुळे किडनीला इजा झाल्याचं निदर्शनास आलं. उन्हाळ्यात सुट्ट्यांसाठी गावी गेलेफ, ङ्गउन्हात प्रवास केलाफ, ङ्गशेतात काम केलंफ ही व यांसारखी ङ्गहीट एक्सपोजर आम्हाला आढळली. किडनी ट्रान्सप्लांट झालेल्या रुग्णांमध्ये दिसणाऱ्या उष्म्याशी संबंधित आजाराचं संशोधन गेल्या वर्षी आमच्या पथकानं प्रकाशित केलं. वरील सर्व उदाहरणांमध्ये वातावरणातील उष्म्यामुळे किडनीला इजा झाली होती, त्याला ङ्गहीट रिलेटेड इलनेसफ किंवा ङ्गउष्म्याशी निगडित आजारफ असं म्हणतात. उष्म्याशी संबंधित आजाराची तीव्रता ङ्गसौम्य थकवाफ ते गंभीर ङ्गहिट स्ट्रोकफ अशी काहीही असू शकते. लहान मुलं, वृद्ध, तसेच मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, किडनीविकार असलेल्या व्यक्तींमध्ये हा आजार व्हायची शक्यता व तीव्रताही अधिक. अशा सर्वांनी त्यामुळेच उन्हाळ्यात काळजी घ्यायला हवी. ङ्गहीट वेव्हफच्या काळात शक्यतो घराबाहेर न पडणं, छत्री, टोपी, हात पाय झाकले जातील असे सुती कपडे परिधान करणं, घराबाहेर पडल्यास पुरेसं स्वच्छ पाणी सोबत बाळगणं, द्रवपदार्थांचं मुबलक सेवन, रक्तदाब, वजन ह्यावर लक्ष ठेवणं व कसलीही शारीरिक लक्षणे आढळली तर त्याकडे दुर्लक्ष न करता वैद्यकीय सल्ला घेणं महत्त्वाचं. मध्य अमेरिकेतील अनेक देशांत तर उष्म्यामुळे होणारा किडनी विकार- मेजोअमेरिकन नेफ्रोपॅथी- हा मोठा व गंभीर प्रश्न बनला आहे. तिथे उसाच्या शेतांमध्ये काम करणाऱ्या मजुरांमध्ये उष्मा आणि त्याचा परिणाम म्हणून कामादरम्यान वारंवार होणारं डिहायड्रेशन हे किडनीच्या आजाराचं मुख्य कारण ठरत आहे. अशाच प्रकारचा आजार उत्तर महाराष्ट्रातील गावांमधील शेतकरी व शेतमजुरांतही आढळतो. अशा ठिकाणी कामाच्या मर्यादित वेळा, पिण्याच्या पाण्याचा मुबलक पुरवठा, कामादरम्यान सक्तीची विश्रांती अशा उपाययोजनांची तातडीनं गरज आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# 'भोंदूगिरी नव्हे महाराष्ट्र धर्म वाढला पाहिजे'

**मुंबई/वृत्तसंस्था :** 'माणसाने श्रद्धा ठेवावी पण त्याने अंधश्रद्धा असता कामा नये, या दोहोंमधील पुसट रेषा ज्याला त्याला कळायला हवी. आपले सरकार महाराष्ट्र धर्म वाढला पाहिजे या विचाराचे जरुर आहे, पण इथे भोंदुगिरीला जराही स्थान नाही, या शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत विधानसभेतील अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना स्पष्ट केले.

नाशिक जिल्ह्यातील भोंदू अशोक खरात याच्या लैंगीक शोषण प्रकरणाची पाळेमुळे सरकार खणून काढणार आहे. या प्रकरणात कोणी कितीही मोठा असला तरी त्याला सोडले जाणार नाही. या प्रकरणाची रोज नवनवी माहिती समोर येत आहे. खरात याच्या मालमत्तांची त्याच्या दृष्कृत्याची माहिती वाढतच आहे. या प्रकरणाच्या सुरस कथा अनेक दिवस राहतील. नागरिकांनी



त्यांच्याकडील माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

न्यायप्रणालीमध्ये राज्याचा डीजीटल वापर ८४ टक्के असून देशात आपण दुसऱ्या क्रमांकावर आहेत. २०१२ मध्ये गुन्ह्यातील दोषसिद्धीचे राज्याचे प्रमाण ८ टक्के होते, आज ७८ टक्के झाले. खुनाचा प्रयत्न वगळता राज्यातील सर्व प्रकारच्या गुन्ह्यात घट आहे.

## पिकविमा नसलेल्या शेतकऱ्यांनाही मदत

दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळवलेल्यांची प्रमाणपत्रे तपासण्यात येत आहेत. धानाला बोनस देण्याची पद्धती निश्चित केली जात आहे. कांदा उत्पादक शेतकरी आणि साखर कारखान्यांना आर्थिक मदतीसाठी केंद्राला विनंती करण्यात येईल. पीक विमा न काढलेल्या आंबा-काजू उत्पादक शेतकऱ्यांना शासन मदत करेल. वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्यासाठी केंद्राला प्रस्ताव पाठवला आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

मुली व महिलांच्या अपहरणाची चुकीची आकडेवारी सातत्याने समोर येत असते. मात्र अपहरणाच्या गुन्ह्यातील ९२ टक्के मुली-महिला सापडतात. बलात्काराचे ९९ टक्के गुन्हे ओळखीच्या व्यक्तीकडून होत आहेत. राज्याचा सायबर प्रकल्प जगातला सर्वोत्तम आहे. डीजीटल अटक हा भोंदू खरातचा भाऊ आहे. डिजिटल अटकेला घाबरु नका. अशी अटक अस्तित्वात नाही.

राज्यात केवळ २४३२० पोलीस पदे रिक्त आहेत, पैकी १६६०७ पदांची भरती प्रक्रिया राबवली जात आहे. पोलीसांच्या १२९५२ घरांचा प्रकल्प सुरु आहे. दोन वर्षात पोलिसांना घरांसाठी २४८७ कोटी रुपये अग्रीम देण्यात आले. सार्वजनिक, शासकीय व खाजगी जागेतील सीसीटीव्ही जोडण्याचा महानेत्र प्रकल्प राज्यात राबवण्यात येत आहे. यामध्ये कृत्रीम प्रज्ञेचा वापर करण्यात येत आहे. या वर्षी ५५०० कोटींचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून अंमली पदार्थ गैरव्यहारामध्ये १७ पोलिसांना बडफर्त करण्यात आल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

## गिरीश महाजन आणि भास्कर जाधव भिडले





**मुंबई/वृत्तसंस्था:** अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी बुधवारी अंतिम आठवडा प्रस्तावावर मुख्यमंत्र्यांच्या उत्तरानंतर विधेयक मंजुरीला आल्याने सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. सत्ताधारी बाकावरच्या सदस्यांनी पुढाकार घेत शिवसेना ठाकरे गटाच्या आमदारांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ गेला. विरोधकांनी सभात्याग केल्याने चर्चेविना दोन विधियके अधिवेशन संस्थगीत करण्यास काही मिनीटे बाकी असताना मंजूर झाली.

भांडवली मूल्य निश्चित करणे, मालमत्ता कर बसवणे आणि गोळा करणे याच्याशी संबंधित मुंबई महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करण्याचे हे विधेयक होते. मुख्यमंत्री फडणवीस यांचे अंतिम आठवडा प्रस्तावाचे उत्तर आज सायंकाळी ६ वाजता संपले आणि ते सभागृहातून निघून गेले. त्यानंतर नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सदर विधेयक मांडले. शिवसेनेचे सुनील प्रभू आणि भास्कर जाधव हे विधेयकावर बोलायचे आहे, अशी मागणी करत उभे होते.

आम्हाला बोलू द्या नाहीतर आम्ही सभागृहाबाहेर जातो, असे जाधव म्हणाले. त्यावर पहिल्या बाकावर असलेले जलसंपदा मंत्री गिरीश महाजन जा.. जा.. असे खाली बसून हातवारे करत म्हणाले. त्यावरुन वाद सुरु झाला. दोन्ही बाजुचे सदस्य तावातावाने बोलू लागले. काही जण अध्यक्षांच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत आले.

## इराणने अमेरिकेचा १५ कलमी शांतता प्रस्ताव फेटाळला

**मुंबई :** गेल्या चार आठवड्यांपासून अमेरिका आणि इराणमध्ये युद्ध सुरू आहे. मात्र, या युद्धावर आता तोडगा काढण्यासाठी पावलं उचलण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा संघर्ष थांबवण्यासाठी इराणसमोर १५ कलमी शांतता प्रस्ताव ठेवला आहे. पाकिस्तानच्या मध्यस्थीने हा प्रस्ताव इराणपर्यंत पोहोचवण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, या प्रस्तावातील काही जाचक अटी इराणला मान्य होणार का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत असतानाच आता इराणकडून अमेरिकेच्या या १५ कलमी शांतता प्रस्तावावर प्रतिक्रिया समोर आली आहे. इराणने युरेनियमचं संवर्धन थांबवावं, होर्मुझ सामुद्रधुनी खुली करावी आणि अण्वस्त्र निर्मितीचे प्रयत्न बंद करावेत, अशा विविध १५ अटी अमेरिकेने ठेवलेल्या आहेत. पण अमेरिकेच्या या अटी इराणने बुधवारी फेटाळून लावत पश्चिम आशियातील युद्ध संपवण्यासाठी स्वतःचा पाच कलमी युद्धविराम प्रस्ताव जारी केला आहे. या प्रस्तावात युद्धात झालेली नुकसान भरपाई आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीवर सार्वभौमत्वाच्या मागणीसह आदी अटींचा समावेश आहे. 'तेहरानचा आग्रह आहे की संघर्षाचा शेवट केवळ तेहरानच्या स्वतःच्या अटींवर आणि वेळेनुसारच होईल.

## चाकणकरांनीच अशोक खरातला प्रोमोट केले; डॉ.आशा मिरगे यांचा गंभीर आरोप..

**अकोला/वृत्तसंस्था :** महिला संघटनांच्या विविध बैठकांना रुपाली चाकणकर अशोक खरातला घेऊन जात होत्या. महिलांपुढे त्या अशोक खरातला 'प्रोमोट' करीत होत्या, असा गंभीर आरोप राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्य डॉ. आशा मिरगे यांनी केला.





गुंगीचे औषध देऊन अत्याचार केल्याप्रकरणी नाशिकमध्ये कॅप्टन अशोक खरातला पोलिसांनी अटक केली. या प्रकरणात विविध धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या डॉ. आशा मिरगे यांनी अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यावर निशाणा साधला.

डॉ.आशा मिरगे म्हणाल्या, आपल्या आजूबाजूच्या महिलांना भोंदूबाबापर्यंत नेण्याचे काम रुपाली चाकणकर यांनी केले. प्रत्येक महिलेला त्यांनीच नेले, असे मी म्हणणार नाही. पण अनेक महिलांना त्यांनीच नेले. महिला संकटनांची बैठक असतांना हा भोंदूबाबा त्या ठिकाणी जात होता. त्या बैठकांमध्ये जाहीरपणे रुपाली चाकणकर त्या भोंदूबाबाला गुरू म्हणून संबोधन होत्या.

आज मी ज्या ठिकाणी आहे, ती यांच्यामुळे पोहचली आहे. हे माझे पांडुरंग आहेत, अशा प्रकाराचे वक्तव्य करीत होत्या. प्रत्येक महिलेला त्यांच्यासारखे पद, व्यक्तिमत्त्व व ग्लॅमर मिळावं, असं वाटतं होतं. रुपाली चाकणकर त्या महिलांमध्ये बाबाला 'प्रोमोट' करीत होत्या. चाकणकर यांनी महिला आयोगात सुद्धा राजकारणच केले. आयएएस असणाऱ्या सदस्य सचिव महिला अधिकाऱ्यांना देखील त्यांनी कधी महत्त्व दिले नाही, असा आरोपही डॉ. मिरगे यांनी केला.

# सत्ताधाऱ्यांनी लोकशाही मूल्ये धाब्यावर बसविली; विरोधकांची टीका

**मुंबई/वृत्तसंस्था :** विरोधकांनी मांडलेल्या प्रस्तावांना कमी महत्व द्यायचे. दोन तीन आठवडे विरोधकांच्या प्रश्नांना उत्तरे द्यायची नाहीत. महत्वाची विधेयक शेवटच्या दिवशी मांडायची. विरोधकांना बोलून द्यायचे नाही. अनेक विषयांना बगल देऊन कामकाज पुढे रेटायचे. अशा अनेक अनिष्ट प्रथा सुरु झाल्या आहेत. लोकशाही मूल्य धाब्यावर बसवण्याचे काम सरकारने सुरु केले असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी सरकारवर केली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत जयंत पाटील, नाना पटोले, नितीन राऊत, सुनील प्रभू, अनिल परब या विरोधी नेत्यांनी सरकारवर सडकून टीका केली. पाशवी बहुमताच्या जोरावर हे सरकार अधिवेशनातील कामकाज विरोधकांना न



जुमानता करीत असल्याचे दिसून आले. सिलिंडरचा काळाबाजार सुरु झाला आहे. तीन हजार रुपयांना एक सिलिंडर विकला जात आहे. राज्यात पेट्रोल, डिझेलची काय स्थिती आहे. हे सरकारने प्रश्न विचारल्यानंतर सांगितले नाही. मंत्रिमंडळातील दोन मंत्र्यांना पोलिसच मारहाण करतात. कायदा आणि सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विधान परिषदेत साताऱ्याच्या पोलिस अधिक्षकाला निलंबित करण्याचा उपसभापती यांचा आदेश सभापती लगेचच फिरवतात. सरकार मधील मित्रपक्षांवर कुरघोडी केली जात आहे. यावरुन सरकारमध्ये बेबनाव आहे, अशी टीका पाटील यांनी केली. निर्विवाद सत्तेचा फायदा कसा घेतला जातो. हे सत्ताधारी पक्षाने या अधिवेशनात दाखवून दिले. सत्ता पिपासू भाजपने सातारा जिल्हा परिषद मिळवण्यासाठी काय केले ते महाराष्ट्राने पाहिले आहे.

सत्ता राबवणाऱ्या सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. कर्जमाफी देऊन सरकारने शेतकऱ्यांचा विश्वाघात केला आहे. पात्र अपात्रतेच्या फेऱ्यात शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा होणार नाही. दोन लाख रोजगार देणाऱ्या सरकारने आरोग्य विभागात कंत्राटी पध्दत जोमाने राबविण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांबरोबर सुशिक्षित तरुणांचा सरकारने विश्वासघात केला आहे. दिवसाला १५ ते २० लक्षवेधी मांडणारे विधान भवन आता लक्षवेधी भवन झाले आहे. शाहू फुले आंबेडकरांची विचारधारा संपवण्याचे काम सरकारने सुरु केले असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसच्या नाना पटोले यांनी केला. विमा नसलेल्या बागायतदारांना नुकसान भरपाईचे मोघम उत्तर देण्यात आले आहे. सरकारने हे अधिवेशन 'मिश्किल'पणाने चालविले आहे. सरकार जनतेच्या प्रश्नांवर गंभीर नसल्याचे दिसून आले, अशी टीका शिवसेना ठाकरे पक्षाच्या सुनिल प्रभू यांनी केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अस्तित्वात नसलेल्या संस्थांकडून हजारो कोटींचा घोटाळा!

## कौशल्य प्रशिक्षणाच्या नावाखाली आगाऊ रक्कम उचलून संस्था पसार

**ठाणे :** ठाण्यात गडकरी रंगायतन नाट्यगृहात महिला कलाकारांची परवानगी न घेता मेकअप रुममध्ये दुरुस्तीसाठी कामगारांनी प्रवेश केल्याचा आरोप नाट्यनिर्मात्याने केला आहे. याबाबत नाट्यगृह प्रशासनाने हलगर्जीपणा केल्याचा आरोप करत निर्मात्याने पालिका प्रशासनावर टीकास्त्र सोडले आहे. तसेच या प्रकरणी ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या निर्देशाने तातडीने नौपाडा पोलीस ठाण्यात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अवघ्या सात महिन्यांपूर्वी दहा महिन्यांपासून अंतर्गत आणि बाह्य नूतनीकरण तसेच दुरुस्ती कामासाठी बंद ठेवलेल्या गडकरी रंगायतन नाट्यगृहाची वास्तू रसिक प्रेक्षकांसाठी खुली करण्यात आली. दहा दिवसांपूर्वी या नाट्यगृहात एका प्रसिद्ध नाटकाचा प्रयोग सुरू होता. यावेळी महिला कलाकारांच्या मेकअप रूममधील प्रसाधनगृहात तीन व्यक्ती पूर्वपरवानगी न घेता शिरल्याचा आरोप नाटकाचे निर्माते राहुल भंडारे यांनी केला. यावेळी मेकअप रूममध्ये महिला कलाकार कपडे बदलत होत्या. त्यावेळी हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी आरडाओरड केली असता तिन्ही व्यक्तींनी येथून पळ काढला. हा प्रकार नाट्यगृहाचे व्यवस्थापक भारत गाडेगावकर यांच्या निदर्शनास आणून दिला असता त्यांनी सहकार्य न केल्याचा आरोप निर्माते भंडारे यांनी केला.संबंधित महिला कलाकाराने नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तसेच संबंधित प्रकाराबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि आयुक्त सौरभ राव यांना याप्रश्नी निवेदन देत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. महापौर पिंपळोलकर यांच्या पाठपुराव्याने या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे भंडारे यांनी नमूद केले.गडकरी'च्या तळमजल्यावर नाट्य परिषदेचे सभागृह आहे. या सभागृहात लिकेज असल्याची तक्रार समोर आली होती. ही बाब ठेकेदाराला निदर्शनास आणून देताच संबंधित लिकेज पहिल्या मजल्यावरील महिला मेकअप रूमच्या स्वच्छतागृहातून असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत होता.

या प्रकाराची गंभीर दखल घेत ठेकेदाराचे कर्मचारी लिकेजची पाहणी करत होते. त्यावेळी हा प्रकार घडल्याची शक्यता असून या प्रकारानंतर पोलिसांना सीसीटीव्ही फुटेज स्वाधीन केल्याची माहिती व्यवस्थापक गाडेगावकर यांनी केली. या प्रकरणी गुन्हा दाखल असून अधिक तपास सुरु असल्याचे नौपाडा पोलिसांनी सांगितले.




### खोटे नियुक्तीपत्र..

प्रशिक्षणानंतर उमेदवारांना देण्यात आलेली अनेक नियुक्तीपत्रे खोटी निघाली. संबंधित कंपन्यांना अशा भरतीबाबत कोणतीही माहिती नव्हती. काही ठिकाणी बायोमेट्रिक हजेरीसाठी बनावट रबरी अंगठ्यांचा वापर करण्यात आला. तपासणीच्या दिवशी भाड्याने विद्यार्थी आणल्याचेही उघड झाले. सकाळी शिवणकाम करणारा, दुपारी ब्युटीशियन आणि सायंकाळी अभिनेता दाखवण्यात आला आहे.

### महाराष्ट्रातही मोठा गैरप्रकार

महाराष्ट्रात विविध संस्थांच्या माध्यमातून ६७ हजार १५४ उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले. मात्र, उमेदवारांचे आधार क्रमांक आणि बँक खाते चुकीचे असल्याने मानधनाचे प्रतिविद्यार्थी ५०० रुपये विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात पोहचू शकले नाही. त्यामुळे या संस्थांनी खोटे विद्यार्थी दाखवले होते हे सिद्ध होते. याशिवाय प्रशिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या पात्रता निकषांचे उल्लंघन करण्यात आल्याचा ठपकाही कॅगने ठेवला. नोकरीसाठी किमान दहावी उत्तीर्ण आवश्यक असताना ५२ हजार उमेदवारांना प्रमाणपत्र देऊन पात्र ठरवले गेले.

### प्रशिक्षण केंद्राच्या पत्त्यावर किराणा दुकान

काही राज्यातील प्रशिक्षण केंद्राच्या पत्त्यावर 'कॅग'ला किराणा दुकान आढळून आले. तरी तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या कार्यालयात कुठलेही यंत्र नसताना वीजतंत्री आणि नळ कामगार प्रशिक्षण घेतल्याचे दाखवण्यात आले. प्रशिक्षण केंद्रावर सीसीटीव्ही आवश्यक असताना अनेक ठिकाणी ते नव्हते. तर काहींनी सीसीटीव्हीचे चित्रीकरण देण्यास नकार दिला.

### मंत्रालयाचे स्पष्टीकरण

कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने 'पीएमकेव्हीवाय' योजनेत सुधारणा करण्यासाठी विविध उपाययोजना केल्याचे 'कॅग'ला सांगितले आहे. नोंदणी प्रक्रियेसाठी 'यूडीआयसीई' प्रणालीचा वापर, देखरेख यंत्रणा मजबूत करणे, तसेच आधार-आधारित ई-केवायसी आणि 'स्कील इंडिया डिजिटल हब' द्वारे प्रशिक्षणानंतर उमेदवारांचा मागोवा घेणे यांसारख्या उपायांचा समावेश करण्यात आल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

## लग्नाचं आमिष आणि फोटो व्हायरलची धमकी; चंदननगरमध्ये दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार

**पुणे :** चंदननगर परिसरात घडलेल्या दोन धक्कादायक घटनांनी शहराला हादरवून सोडलं आहे. अल्पवयीन मुलींना प्रेम आणि लग्नाचं आमिष दाखवत त्यांच्यावर अत्याचार केल्याचं समोर आलं आहे. या प्रकारांमुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे. एका घटनेत बालाजी गुरुनाथ स्वामी (वय २७, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) याने अल्पवयीन मुलगी असल्याचं माहिती असूनही तिला गोड बोलून आपल्या जाळ्यात ओढलं. तिचा विश्वास जिंकत त्याने वेळोवेळी तिच्यावर अत्याचार केला. हा प्रकार समोर आल्यानंतर मुलीच्या आईने जाब विचारला असता, आरोपी थेट त्यांच्या घरात घुसला आणि आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिली, असा आरोप करण्यात आला आहे.तर दुसऱ्या घटनेत ऋतिक रावसाहेब लोणके (वय २७, रा. सोमनाथनगर, वडगाव शेरी) यानेही असाच प्रकार केल्याचं उघड झालं. त्याने अल्पवयीन मुलीला लग्नाचं आमिष दाखवलं आणि तिच्यावर अत्याचार केला. एवढंच नाही, तर तिच्यासोबत बोलून दिले नाही तर तिचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तिला गप्प ठेवण्याचा प्रयत्न केला.या दोन्ही घटनांमध्ये पीडित कुटुंबांनी पुढे येत तक्रार केल्यानंतर हे प्रकार उघड झाले आहेत. या घटनांमुळे परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. दोन्ही आरोपींवर पोक्सो अंतर्गत चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे आणि अटक करण्यात आली आहे. दरम्यान, वाघोली आणि हडपसर भागातही अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेण्याच्या घटना समोर आल्याने शहरात अशा गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर पालकांनी मुलींच्या सुरक्षिततेबाबत अधिक जागरूक राहण्याची गरज अधोरेखित होत आहे. मात्र वाढत्या अल्पवयीन मुलींच्या फसवणूकीचा प्रश्न देखील तितकाच गंभीर होत आहे. सोशल मीडिया वरील मैत्री आणि तेथून होणारी फसवणूक एकीकडे वाढली असताना आता लग्नाचे आमिष दाखवून मुलींना फसवण्याच्या घटनामध्ये देखील वाढ होत आहे. अशा घटनानंतर शहरातील मुली स्वतःला असुरक्षित मानत असल्याचे देखील सांगण्यात येत आहे.

## खरातच्या केबिनमध्ये महिला शिरताच झुंबर बंद, कर्मचाऱ्यांसाठी नो एन्ट्रीचा 'कोडवर्ड', थक्क करणारे कारनामे

**नाशिक :** भोंदूगिरी करणारा 'कॅप्टन' अशोक खरात याच्या कुकर्मांचे बिंग फुटल्यापासून त्याचे दररोज नवनवीन कारनामे उजेडात येत आहेत. खरात याची फसवणुकीची, महिलांचे लैंगिक शोषण करण्याची खास कार्यपद्धतीची पंचसूत्री होती. या पंचसूत्रीच्या बळावर खरात समोरच्याचा विश्वास संपादन करून त्यांना जाळ्यात ओढत असे.भोंदू अशोक खरात हा त्याच्याकडे येणाऱ्यास जन्मतारीख विचारून अचूक जन्मावर सांगत असे. असे करून तो आपण अफाट बुद्धिमान असल्याचे भासवत असे. अशोक खरात हा त्याच्याकडे येणाऱ्या जोडप्यांना समोर बसवून त्यांच्या आर्थिक संपन्नतेचा प्रथम अंदाज घेत. तुम्हाला एकच संतती होईल. दुसरे अपत्य होऊ शकणार नाही. त्यात पती दोषी असल्याचे तो दोघांना सांगत. त्यामुळे पती-पत्नीत वितुष्ट निर्माण होई. अशा परिस्थितीत खरात महिलेची सहानुभूती मिळविण्यात यशस्वी होई. दोन अपत्ये असतील, तर अशा जोडप्याला त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला एकत्र बसवून त्यांच्यासमोर पतीला एकच मुल तुझे, दुसरे तुझे नाही असे तो सांगे. असे करून खरातने अनेक जोडप्यांचे घटस्फोटही घडवून आणले. नंतर या महिलांना वासनेच्या जाळ्यात ओढी.खरात हा मोठे अधिकारी, उद्योगपतींसोबत मुलींचे संबंध जुळवून द्यायचा. त्यासाठी तो अंकशास्त्राचा आधार घेत असल्याचे भासवायचा. नंतर मर्जीतील मुलीला अधिकारी, उद्योगपतीच्या विरोधात फितवून त्यांच्याविरोधात स्वतःकडे तक्रार घ्यायचा. मुलीच्या तक्रारीचा व्हिडीओ करायचा.जोडप्यांना समोर बसवून पत्नीमुळेच यशस्वी झाल्याचे पतीला सांगून तो महिलेच्या मनात सहानुभूती तयार करीत असे. भाग्य उजळण्यासाठी त्यांना वास्तव्याची जागा, घर बदलण्यास सांगे. अंकशास्त्राचा आधारे त्यांना जागा सुचवून ती खरेदी करण्यास भाग पाडत असे. ही जागा त्याचीच असे.खरात हा त्याच्याकडे येणारी व्यक्ती कोण आहे हे बघून ती व्यक्ती ज्या क्षेत्रातील आहे, त्या क्षेत्रातील वरिष्ठ पातळीवरील व्यक्तींना फोनवर संपर्क करून आपला वट दाखवित असे. पोलिस अधिकारी आल्यास त्यांच्यासमोर खरात थेट 'एडीजी', 'आयजी' यांना फोन करीत असे. लोकप्रतिनिधी आल्यास मंत्र्यांना फोन करून त्यांच्याशी संवाद साधून स्वतःची पोहोच दाखवित असे.तो ज्या खोलीत महिलांना घेऊन जाई आणि ठोकताळ्यांवर आधारित भाकीत सांगे, प्रसंगी लैंगिक अत्याचार करे, त्या खोलीच्या बाहेरील छताला असलेल्या झुंबरचा लाइट आतून बंद करीत असे. या झुंबरातील लाइट बंद तोपर्यंत चेंबरमध्ये कोणालाही प्रवेश द्यायचा नाही, हा त्याचा अर्थ असे. त्याच्या कार्यालयात काम करणाऱ्यांना ही सांकेतिक भाषा ठाऊक होती.



# मंत्री झिरवाळ यांची तृतीय पंथीयासोबत अश्लील चित्रफित व्हायरल

**मुंबई :** राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री व राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवाळ यांची तृतीयपंथी व्यक्तीसोबतची अश्लील चित्रफित समाज माध्यमावर प्रसारित झाल्याने खळबळ उडाली आहे. हा प्रकार मंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानीतील असून काँग्रेसने झिरवाळ यांची मंत्री पदावरून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे.

तृतीयपंथी पवन यादव हा मंत्री झिरवाळ यांच्यासोबत चित्रफितीमध्ये दिसतो आहे. यादव याच्यावर मुंबईतील कुरार पोलिस ठाण्यात खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल आहे. झिरवाळ हे नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी या आदिवासी बहुल मतदार संघाचे आमदार आहेत. त्यांची प्रसारित झालेली चित्रफीत सात महिन्यापूर्वीची आहे. शासकीय निवासस्थानामध्ये तृतीयपंथी व्यक्ती मंत्री झिरवाळ यांच्यासोबत बिछान्यावर असून शेजारी खाद्य आणि मद्य आहे.

या चित्रफीत प्रकरणाची झिरवाळ यांना कल्पना होती. मंगळवारी झिरवाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन याबाबत चर्चा केल्याचे सूत्रांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर पक्षांमध्ये मोठा गोंधळ सुरू आहे. मंत्री पदासाठी काही इच्छुक असून त्यामधून झिरवाळ यांना लक्ष केले जात असल्याची पक्षांमध्ये चर्चा आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाचे अध्यक्षपद सुनेत्रा पवार यांना मिळायला हवे, अशी मागणी करणारे झिरवाळ हे राष्ट्रवादीचे पहिले नेते होते. दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण करण्याचे अजित पवार यांनी ठरवले होते, असेही झिरवाळ यांनी जाहीर सांगितले आहे. ही चित्रफीत समोर आल्यानंतर झिरवाळ चर्चेत आले असून त्यांच्यावर कारवाई होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे यांच्यानंतर मंत्रीपद सोडावे लागणारे झिरवाळ हे राष्ट्रवादी काँग्रेसचे तिसरे मंत्री ठरतील.



### राजीनाम्याची मागणी

मंत्री नरहरी झिरवाळ यांची चित्रफित समाज माध्यमावर प्रसारित होणे महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतिक अध:पतनाचे ज्वलंत उदाहरण आहे. झिरवाळ यांचा मंत्रीपदाचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाधक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. या संदर्भात झिरवाळ यांच्या स्वीय सहायकांशी संपर्क साधला असता साहेबांना याप्रकरणी काही बोलायचे नाही, असे सांगण्यात आले.

# BCCIकडून नियमावली, IPLच्या पहिल्या मॅचमध्ये RCBचे सगळे खेळाडू एकाच नंबरच्या जर्सीने खेळणार



**मुंबई/वृत्तसंस्था** : बीसीसीआयने काही दिवसांपूर्वी सरावाबाबत सूचना केल्या होत्या. आता संघांचा प्रवास, मैदानावरील निबंध याबाबतचे नियम संघांना कळवले आहेत. नव्या नियमानुसार सामन्याच्या दिवशी खेळाडूंना मैदानात सरावास पूर्ण मनाई करण्यात आली आहे. त्या दिवशी तंदुरुस्ती चाचणीही घेता येणार नाही. अर्थात, हा सराव मुख्य मैदानात करता येणार नाही. पूर्वनिश्चित नेटमध्ये मात्र खेळाडूंना सराव करता येणार आहे. सरावाच्या ठिकाणी अधिस्वीकृतीधारक खेळाडू आणि सहायकांनाच प्रवेश देण्यात येणार आहे. कुटुंबीयांनी मैदानात न येता आतिथ्य कक्षात बसण्यास सांगण्यात आले आहे.सरावातील सहभागी सहायक गोलंदाज; तसेच 'श्रोडाउन' तज्ज्ञांना बीसीसीआयचीमंजुरी आवश्यक असणार आहे. सरावाच्या ठिकाणी खेळाडूंनी संघाच्या बसमधूनच येणे बंधनकारक असेल. कुटुंबीयांना या बसमध्ये प्रवेश नसेल. सरावाच्या वेळी एलईडी जाहिरात बोर्डांना चेंडू लागणार नाही याची काळजी घेण्याची सूचना करण्यात आली आहे. प्रतिस्पर्धी संघास देण्यात आलेल्या खेळपट्टीचा सरावाच्या वेळी वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सरावाच्या वेळी प्रत्येक संघास दोन नेटः तसेच मुख्य खेळपट्टीशेजारील विकेटवर सरावास परवानगी देण्यात आली आहे.यंदाच्या आयपीएलची सलामीची लढत गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूआणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात एम. चिन्नस्वामी स्टेडियममध्ये होईल. त्याआधी कर्नाटक राज्य क्रिकेट संघटना (केएससीए) आणि आरसीबीने मंगळवारी काही निर्णय जाहीर गेले. गत वर्षी आरसीबीच्या विजयी जल्लोषादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्या ११ चाहत्यांच्या स्मरणार्थ हे निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयानुसार बेंगळरूचे खेळाडू सरावादरम्यान ११ क्रमांकाची जर्सी घालतील, तर मैदानातील ११ खुर्चा रिकाम्या ठेवण्यात येतील. चिन्नस्वामी स्टेडियममधील; तसेच आसपासच्या परिसरातील गर्दीचे व्यवस्थापन मजबूत करण्यासाठी सुमारे सात कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. हा सर्व खर्च स्टेडियमवर होईल.

## न्यूझीलंडच्या फलंदाजामुळे सूर्याला फायदा



**मुंबई/वृत्तसंस्था** : आयसीसीने पुन्हा एकदा नवीन क्रमवारी जाहीर केली आहे. मागच्या वेळेपासून फारसे टी-20 सामने झाले नसले तरी, त्यात फारसे बदल झालेले नाहीत, पण काही किरकोळ चढ-उतार आहेत. विशेष म्हणजे, भारतीय संघाचा कर्णधार सूर्याकुमार यादव अलीकडे एकही सामना खेळलेला नाही, तरीही त्याला याचा फायदा झाला आहे. तो पुन्हा वर येण्यात यशस्वी झाला आहे.

यावर्षी जाहीर झालेल्या आयसीसी टी-20 क्रमवारीत टीम इंडियाचा सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्मा अव्वल स्थानावर आहे. त्याचे रेटिंग 875 आहे. इशान किशन 871 रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर आहे. पाकिस्तानचा साहिबजादा फरहान 848 रेटिंगसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. इंग्लंडचा फिल सॉल्ट 792 रेटिंगसह चौथ्या क्रमांकावर आहे. श्रीलंकेचा पथुम निस्संका 766 रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर आहे. भारताचा तिलक वर्मा 742 रेटिंगसह सहाव्या क्रमांकावर कायम आहे. आयसीसी टी20 क्रमवारीत पहिल्या सहामध्ये कोणताही बदल झालेला नाही. याचा अर्थ फलंदाज पूर्वीच्याच स्थानावर कायम आहेत. आता, भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव सातव्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याचे रेटिंग 722 आहे. याचा अर्थ सूर्याच्या रेटिंगमध्ये कोणताही बदल झालेला नाही. असे असूनही, त्याने यावेळी दोन स्थानांची झेप घेतली आहे.सध्या न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात टी-20 मालिका खेळली जात आहे. टिम सायफर्ट या मालिकेत खेळत नाहीये. जर एखादा संघ खेळत असेल आणि त्या संघातील एखादा खेळाडू खेळत नसेल, तर आयसीसी क्रमवारीत त्या संघाचे मानांकन कमी होते. टिम सायफर्ट या मालिकेचा भाग नाही आणि न खेळल्यामुळे त्याचे मानांकन घसरले आहे. सायफर्टचे मानांकन 719 पर्यंत घसरले आहे, त्यामुळे सूर्या न खेळता त्याच मानांकनासह सातव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

एवढेच नाही, तर दक्षिण आफ्रिकेचा डेवाल्ड ब्रेविस देखील न्यूझीलंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका मालिकेचा भाग नाही, त्यामुळे न खेळल्यामुळे त्याचे मानांकनही घसरले आहे.

## नाईट रायडर्सचे टेन्शन दूर; हर्षित राणाची रिप्लेसमेंट मिळाली

**मुंबई/वृत्तसंस्था** : आयपीएल 2026 28 मार्च रोजी सुरू होणार आहे, परंतु अनेक संघ दुखापतग्रस्त खेळाडूंमुळे त्रस्त आहेत. परिणामी, या दुखापतग्रस्त खेळाडूंच्या जागी नवीन खेळाडूंची घोषणा दररोज केली जात आहे. दरम्यान, कोलकाता नाईट रायडर्सचा हर्षित राणा दुखापतीमुळे आयपीएलच्या स्पर्धेतून बाहेर पडला आहे. आता हर्षित राणाची रिप्लेसमेंटची घोषणा केली आहे.कोलकाता नाईट रायडर्सने स्टार वेगवान गोलंदाज Harshit Rana च्या जागी 33 वर्षीय वेगवान गोलंदाज Navdeep Saini ला संघात स्थान दिले आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे हर्षित राणा मैदानावर परत येऊ शकलेला नाही. टी-20 विश्वचषक सुरू होण्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सराव सामन्यात दुखापत झाल्यामुळे हर्षितला आयसीसी टी-20 विश्वचषक 2026 देखील खेळता आला नाही. तेव्हापासून हर्षित आपल्या दुखापतीतून सावरत आहे.हर्षित राणाच्या या हंगामात खेळण्याची शक्यता कमी मानली जात आहे. अशा परिस्थितीत, केकेआरने हर्षित राणाच्या जागी अनुभवी वेगवान गोलंदाज नवदीप सैनीला संघात स्थान दिले आहे. सैनीने आतापर्यंत आयपीएलमध्ये 32 सामन्यांमध्ये 23 बळी घेतले असून, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही त्याच्या नावावर 23 बळी आहेत. केकेआरने



सैनीला 75 लाख रुपयांना करारबद्ध केले असून, डेथ ओव्हर्समध्ये तो संघाला मजबूत करेल अशी अपेक्षा आहे.दुसरीकडे, गुजरात टायटन्सने दुखापतग्रस्त पृथ्वीराज याराच्या जागी वेगवान गोलंदाज कुलवंत खेजरोलियाला संघात स्थान दिले आहे. खेजरोलियाने आयपीएलमध्ये 6 बळी घेतले असून, तो यापूर्वी गुजरात, केकेआर आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूर या संघांकडून खेळला आहे. त्याला 30 लाख रुपयांना संघात सामील करण्यात आले आहे. आयपीएल 2026 सुरू होण्यापूर्वीच दुखापतग्रस्त खेळाडूंची वाढती संख्या संघांसाठी चिंतेचा विषय बनत आहे. अशा परिस्थितीत, बदली खेळाडूंवर संघाच्या अपेक्षा पूर्ण करण्याची मोठी जबाबदारी असेल. आता नवदीप सैनी आणि कुलवंत खेजरोलिया आपल्या गोलंदाजीने किती प्रभावी ठरतात हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. आयपीएलचा पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि सनरायझर्स हैदराबादमध्ये रंगणार आहे.

# चेन्नई सुपर किंग्जने अडचण सोडवली ; तरीही डोकेदुखी कायमच

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएलला आता 28 मार्च 2026 पासून सुरुवात होणार आहे. अवघे तीन दिवस शिल्लक असतानाही संघाकडून विशेष घोषणा होत आहे. काही खेळाडू दुखापतीमुळे उशिरा सामील होणार आहेत तर काही खेळाडूंनी स्पर्धेतून माघार घेतलेली दिसत आहे. आता यातच चेन्नई सुपर किंग्स साठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. स्पेन्सर जॉन्शन च्या बाबातीत एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.ऑस्ट्रेलियाचा डावखुरा वेगवान गोलंदाज स्पेन्सर जॉन्सन गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स संघांकडून खेळला आहे. यावर्षी, चेन्नई सुपर किंग्सने त्याला नॅथन एलिसच्या जागी बदली खेळाडू म्हणून करारबद्ध केले होते. एलिसला चेन्नईने 2 कोटी रुपयांना करारबद्ध केले होते. दुखापत झाल्यामुळे तो 2026 च्या हंगामातून बाहेर पडला. स्पेन्सर जॉन्सनच्या बाबतीतही चेन्नई सुपर किंग्सला धक्का बसला आहे. जॉन्सन आयपीएल 2026 च्या पहिल्या सत्रातून बाहेर पडला आहे.चेन्नईने सोशल मीडियावर ही घोषणा केली



असून, तो 21 ते 23 एप्रिल दरम्यान संघात सामील होईल असे म्हटले आहे. चेन्नईने ट्विट केले, 'येलो टू येलो लव्ह.' स्पेन्सर जॉन्सन नॅथन एलिसची जागा घेईल आणि 21 ते 23 एप्रिल दरम्यान संघात सामील होईल. जॉन्सन देशांतर्गत स्तरावर दक्षिण ऑस्ट्रेलियाकडून खेळतो. हॅरिस म्हणाले, "आता जॉन्सनसाठी चांगली बातमी आहे. त्याची पाठ पूर्णपणे बरी झाली आहे. गेल्या 8-10 महिन्यांपासून या त्रासाने त्रस्त होता. पण चांगली बातमी ही आहे की तो पुन्हा गोलंदाजी करत आहे. यामुळे त्याला आयपीएलमध्ये एक उत्तम संधी मिळेल. आयपीएलमध्ये जाण्यापूर्वी तो काही गोलंदाजी करेल. त्यामुळे आम्ही सध्या त्यावर काम करत आहोत."हॅरिस आयपीएलमध्येही खेळला आहे. तो पंजाब किंग्स संघाचा भाग होता. हॅरिस सध्या स्पेन्सर जॉन्सनसोबत काम करत असून त्याच्या गोलंदाजीच्या शैलीत काही बदल करत आहे.

जॉन्सनच्या अनुपस्थितीत, न्यूझीलंडचे मॅट हेन्री आणि जॅक फोक्स चेन्नईच्या वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व करतील. इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू जेमी ओव्हरटनही उपस्थित असेल. भारतीय गोलंदाजीमध्ये खलील अहमद, मुकेश चौधरी, अंशुल कंबोज आणि गुर्जपनीत सिंग यांचाही समावेश असेल.

# धुरंधर 2'बद्दल अमिषा पटेलची अशी पोस्ट वाचून काहींना लागेल मिर्ची; नेमका कोणाला टोला?

अभिनेत्री अमीषा पटेलने आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर : द रिव्हेंज' या चित्रपटाबद्दल अशी पोस्ट लिहिली आहे, जी वाचून काहींना नक्कीच मिर्ची लागेल. अमीषाने या पोस्टमधून नेमका कोणाला टोला लगावला आहे, याविषयी नेटकरीही प्रश्न विचारत आहेत. सध्या बॉक्स ऑफिसवर आणि सोशल मीडियावर 'धुरंधर 2 : द रिव्हेंज'ची लाट आहे आणि लाटेवर अनेकांना स्वार व्हायचं आहे. एखादा चित्रपट ट्रेंडमध्ये असला की त्याबद्दल अनेकजण सोशल मीडियावर काही ना काही पोस्ट करताना दिसतात. काहीजण त्या चित्रपटाचं कौतुक करतात, तर काहीजण त्या चित्रपटाचं उदाहरण देऊन इतरांवर निशाणा साधतात. अभिनेत्री अमीषा पटेलसुद्धा असंच काहीसं करताना दिसतेय. आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर: द रिव्हेंज' या चित्रपटाबद्दल तिने एक्स (ट्विटर) अकाऊंटवर पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये तिने नेमका कोणाला टोला लगावला आहे, असा प्रश्न नेटकरी विचारत आहेत. इतकंच नव्हे तर बॉलिवूड इंडस्ट्रीतील इतर दिग्दर्शकांना तिने आदित्यकडून काही गोष्टी शिकण्याचा सल्ला दिला आहे.डोळे उघडणारा चित्रपट.. इंडस्ट्रीकडून 'धुरंधर'चं कौतुक होणं चांगली बाब



आहे आणि हा ब्रँड त्या सर्व प्रशंसेसाठी पात्र आहे. इंडस्ट्रीने ही गोष्ट लक्षात घेणं खूप गरजेचं आहे की, आदित्यने चित्रपट बनवला आहे, प्रोजेक्ट नाही. त्याने अभिनेत्यांना कास्ट केलं आहे, पार्ट्यांमध्ये ट्रेंड होणाऱ्या इन्स्टाग्रामर्सना नाही. त्यामुळे प्रोजेक्ट्स बनवणं थांबवा आणि चित्रपट बनवणं सुरू करा', अशा शब्दांत अमीषाने सुनावलं आहे.अमीषाच्या या ट्विटर नेटकरी विविध प्रतिक्रिया देत आहेत. 'हा टोमणा नेमका कोणाला आहे? पण वाचून छान वाटलं', असं एका युजरने म्हटलं आहे. तर 'अमीषा बरोबर बोलली आहे. जेव्हा कथेला प्राधान्य दिलं जातं आणि कास्टिंग योग्य केली जाते, तेव्हा फरक स्पष्ट दिसतो. अधिक चित्रपट आणि कमी प्रोजेक्ट्स.. हे गरजेचं आहे', असं म्हणत दुसऱ्या युजरने अमीषाच्या मताशी सहमती दर्शविली. 'जेव्हा तुम्ही अभिनेत्यांना कास्ट करता, तेव्हा तुम्हाला धुरंधरसारखा जादुई चित्रपट मिळतो. जेव्हा तुम्ही इन्फ्लुएन्सर्सना कास्ट करता, तेव्हा तुम्हाला फक्त दोन दिवसांचा ट्रेंड मिळतो', असं एका नेटकऱ्याने लिहिलं आहे.

अमीषाने अशा पद्धतीने बॉलिवूड इंडस्ट्रीतील ठराविक लोकांवर निशाणा साधण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. याआधीही तिने इंडस्ट्रीबाबत बेधडक मतं मांडली आहेत. आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर 2' या चित्रपटाने प्रदर्शनाच्या सहा दिवसांत जगभरात तब्बल 919 कोटी रुपये कमावले आहेत. कमाईचा हा आकडा वेगाने वाढत असून लवकरच हा चित्रपट 1000 कोटी रुपयांचाही टप्पा पार करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## मी नेहमीच तुला निवडेन' तिहार तुरुंगातून सुकेशचं जॅकलिनसाठी पत्र

देशातील सर्वात कुख्यात ठग, सुकेश चंद्रशेखर, त्याच्या पत्रामुळे पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. तिहार तुरुंगात कैद असलेल्या सुकेशनं, आपल्या वाढदिवसानिमित्त जॅकलिन फर्नांडिसला एक पत्र लिहिलं असून हे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झालं आहे.पत्रात सुकेशनं लिहिलं आहे की, या खास दिवशी त्याला जॅकलिनची सर्वात जास्त आठवण येते. जेव्हा इतर लोक आपला वाढदिवस साजरा करतात, तेव्हा त्याला जॅकलिनची आठवण येते. तिचा आवाज, तिचं हसणं आणि त्यांनी एकत्र घालवलेल्या क्षणांची आठवण येत असल्याचं सुकेशनं पत्रात म्हटलं आहे.सुकेश चंद्रशेखर अनेकदा जॅकलिनवर प्रेमाचा वर्षाव करतो. त्यानं यापूर्वीही तुरुंगातून अभिनेत्रीला पत्र लिहिली आहेत. पण यावेळी त्याने आपले प्रेम एका अनोख्या पद्धतीने व्यक्त केलं आहे. सुकेश म्हणाला, 'जग काहीही म्हणो, माझ्यावर कितीही संकटं आली तरी, मी नेहमी तुलाच निवडेन कारण, माझं तुझ्यावर जीवापाड प्रेम आहे. मला आशा आहे की, तुलाही माझ्या भावना कळत असतील. मला तुझी खूप आठवण येतेय.'सुकेशने आपल्या



पत्रात असंही म्हटलं आहे की, त्याच्या चालू असलेल्या कायदेशीर लढ्यांमुळे जॅकलिनला अडचणींचा सामना करावा लागतोय, त्यामुळे त्याला खूप वाईट वाटतंय. सुकेशने माफी मागितली आणि लिहिलं की, 'एक दिवस सर्व काही ठीक होईल आणि सत्याचा विजय होईल. कारण तू माझ्यासाठी खूप खास आहेस. मी कायमचा तुझाच आहे. मी तुझ्यावर खूप प्रेम करतो.'सुकेशने पॅरिसमधील एका प्रसिद्ध पुलावर 'जॅकी आणि शेखर' असं कोरलेलं एक 'लव्ह लॉक' अडकवलं आहे. सुकेशनं सांगितलं की, 'आज, खास दिवशी, मी असं काहीतरी केलं जे मी याआधी कधीच केलं नव्हतं. तुला आणि स्वतःला नेहमी देत असलेल्या महागड्या आणि दिखाऊ भेटवस्तूंऐवजी, मी तुझ्या वतीनं स्वतःला एक भेट दिली. मी कोणालातरी पॅरिसला पाठवलं.

## रोहित सराफला मिळालं खरं प्रेम ? 'लापता लेडीज'च्या हिरॉईनसोबतचे फोटो व्हायरल, चर्चांना उधाण

लापत्ता लेडीज' फेम अभिनेत्री प्रतिभा रांता आणि बॉलिवूड अभिनेता रोहित सराफ यांच्या नात्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. सूत्रांनुसार, हे दोघे सध्या एकमेकांसोबत चांगला वेळ घालवत आहेत. दिवाळी पार्टीतील एकत्र फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्यांच्यातील जवळीक स्पष्ट झाली होती. सध्या ते आपल्या नात्याला कोणतेही नाव देण्यास घाई करत नसले तरी, चाहत्यांमध्ये मात्र त्यांच्या 'डेटिंग'ची उत्सुकता वाढली आहे.अवघ्या काही वर्षांपूर्वी आलेला 'लापता लेडीज ' चित्रपट अनेकांनी पाहिला असेल, साधी सरळ कथा, दोन नायिका आणि नायक, खिळवून ठेवणाऱ्या या चित्रपटाची ऑस्कर सोहळ्यासाठीही भारतातून निवड झाली होती. याच चित्रपटात प्रमुख भूमिकेमध्ये दिसलेली अभिनेत्री प्रतिभा रांता रातोरात स्टार बनली. 'लापता लेडीज'नंतर ती बॉलिवूड स्टार बनली आणि लाखो लोकांच्या हृदयात तिने स्थान मिळवलं आहे. मात्र सध्या प्रतिभा कामामुळे नव्हे तर पर्सनल लाइफमुळे चर्चेत आहे. सध्या अशा चर्चा सुरू आहेत की तिला तिचं खरं प्रेम सापडलं आहे. प्रतिभा आणि प्रख्यात अभिनेता रोहित सराफ एकमेकांच्या प्रेमात आहेत, असंही बोललं जात आहे. हे दोन्ही कलाकार सध्या एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेत आहेत, असा दावा एका मॅगझिनने केला आहे. जरी ते रोमँटिकरित्या इनव्हॉल्व असले तरी त्यांना इतक्यातच, त्यांच्या नात्याला नाव द्यायचं नाहीये,असंही समोर येत आहे.एका सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, 'प्रतिभा आणि रोहित सध्या एकमेकांसोबत वेळ घावत आहेत, आनंद लुटत आहेत. ते दोघं चांगले मित्र आहेत, त्यांच्या आत्मियता आहे. ते बऱ्याचदा एकत्र वेळ घालवतात. त्यांच्यात एक नैसर्गिक जिव्हाळा आणि सहजता आहे, पण त्यांना त्यांच्या नात्याला नाव देण्याची घाई नाहीये'. मात्र असं असलं तरी रोहित सराफ आणि प्रतिभा रांता या दोघांनीही त्यांच्या डेटिंगच्या अफवांची पुष्टी केली नसली तरी हे वृत्त नाकारलं देखील नाहीये.



रोहित सराफच्या चाहत्यांनी अनेकदा त्याचं नाव प्राजक्ता कोळीसोबत जोडलं होतं. मात्र प्राजक्ताने गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये तिचा प्रियकर वृशांक खनालसोबत लग्न केलं. रोहित प्राजक्ताच्या लग्नाला उपस्थित राहिला नव्हता, पण त्याने तिला त्याच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरील स्टोरीद्वारे शुभेच्छा पाठवल्या. "अभिनंदन प्राजक्ता कोळी आणि वृशांक खनाल. तुम्ही दोघं सर्वात सुंदर कपल" असं त्याने त्यांच्या लग्नाची पोस्ट पुन्हा शेअर करत लिहिलं होतं.असं असतानाच आता रोहित-प्रतिभाच्या रिलेशनची जोरदार चर्चा सुरू आहे. गेल्या वर्षी जेव्हा ते निखिल अडवाणीच्या दिवाळी पार्टीमध्ये एकत्र दिसले होते, तेव्हा या सगळ्याची सुरुवात झाली. रोहित आणि प्रतिभा, दोघांनीही सारखेच कपडे घातले होते. रोहितने लाल आणि सोनेरी रंगाचा कुर्ता आणि पांढरा पायजमा घातला होता, तर प्रतिभा लाल रंगाच्या शरारा सेटमध्ये खूपच सुंदर दिसत होती.

## केदार शिंदेंच्या नव्या चित्रपटाची जोरदार चर्चा, लेकीचीच निर्मिती....

मराठी चित्रपटसृष्टीत स्त्रीप्रधान आणि कुटुंबप्रधान विषयांना वेगळी ओळख देणारे दिग्दर्शक केदार शिंदे आता आणखी एका वेगळ्या आणि विचार करायला लावणाऱ्या संकल्पनेसह प्रेक्षकांसमोर येत आहेत. 'अगंबाई...अरेच्चा!', 'बाईपण भारी देवा' आणि 'अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई?' या यशस्वी चित्रपटांनंतर आता 'आई भाड्याने हवी?' या नव्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. सनफ्लॉवर स्टुडिओ निर्मित या चित्रपटाची कथा आणि लेखन वैशाली शशी नाईक आणि ओंकार वसुंधरा दत्त यांनी केलं आहे. विशेष म्हणजे 'अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई?'नंतर निर्माती सना शिंदे, दिग्दर्शक केदार शिंदे, लेखिका वैशाली शशी नाईक, लेखक ओंकार वसुंधरा दत्त ही चौकडी पुन्हा एकदा एकत्र येत असल्याने चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढली आहे.या चित्रपटाविषयी दिग्दर्शक केदार शिंदे सांगतात, "स्त्रीप्रधान विषय हाताळणं ही नेहमीच जबाबदारीची आणि आव्हानात्मक गोष्ट असते. जोपर्यंत एखादी कथा मनापासून भिडत नाही, तोपर्यंत अशा चित्रपटाची सुरुवात करायची नाही, असा माझा ठाम निर्धार होता. 'अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई?' आणि 'आई भाड्याने हवी?' या दोन्ही चित्रपटांचे काम 2023 पासून सुरू झालं. 'आई भाड्याने हवी?' हा चित्रपट मी ज्यांना आदर्श मानतो त्या राजकुमार हिरानी यांच्या शैलीची झलक देणारा आहे. हा केवळ विनोदी चित्रपट नाही, तर 'आई' या नात्याचा गाभा मांडणारा, मनाला स्पर्श करून जाणारा अनुभव आहे. मनोरंजनासोबतच विचार




करायला लावणं हे माझं ध्येय असतं आणि या चित्रपटात ते प्रकर्षाने जाणवेल. शीर्षकातूनच आजच्या काळातील भावनिक तगमग जाणवते. सध्या कलाकारांची निवड सुरू असून, विविध वयोगटातील 'आई' प्रेक्षकांना पाहायला मिळतील. जून-जुलैमध्ये चित्रीकरणाला सुरुवात होईल."निर्माती सना शिंदे म्हणाली, "पहिल्या चित्रपटाला प्रेक्षकांनी दिलेल्या प्रेमामुळे या नव्या चित्रपटाबद्दलही तितकीच उत्सुकता आहे. पहिला चित्रपट भावनिक अंगाने साकारण्यात आला होता, तर 'आई भाड्याने हवी?' हा पूर्णपणे मनोरंजनप्रधान, रंगतदार आणि मल्टीस्टारर आहे. यात नातेसंबंध, भावना आणि विनोद यांचा सुरेख संगम अनुभवायला मिळेल. मला वैयक्तिकरित्या स्त्रीकेंद्री कथा आवडतात, त्यात 'आई' ही प्रत्येकाच्या आयुष्यातील सर्वात सक्षम आणि प्रभावी व्यक्तिरेखा असते. प्रेक्षकांना आशयघन आणि मनाला भिडणारे चित्रपट देण्याचा आमचा प्रयत्न कायम असतो, आणि हा चित्रपट त्याच दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल आहे."

'आई भाड्याने हवी?' या वेगळ्या शीर्षकातूनच प्रेक्षकांच्या मनात कुतूहल निर्माण होत आहे.

# नांदुरा येथे राज्यस्तरीय शालेय तेंग सु-डो क्रीडा स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**जनसंचलन/बुलढाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय (पुणे) अंतर्गत, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि तेंग सु-डो स्पोर्ट्स असोसिएशन, नांदुरा यांच्या तांत्रिक व आर्थिक सहकार्याने राज्यस्तरीय शालेय तेंग सु-डो (१४, १७ व १९ वर्षांखालील मुले-मुली) क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन २४ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

नांदुरा येथील नगर परिषदेच्या छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन शहराच्या प्रथम नागरिक आणि नगराध्यक्षा मंगलाताई सुधीरजी मुऱ्हेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी आदित्यकुमार सिंह, पोलीस निरीक्षक पावरा, मुख्याधिकारी मिलिंद दरोकार, जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर, तेंग सु-डो असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष रॉकी डिसोजा आणि स्थानिक असोसिएशनचे अध्यक्ष सुधीरभाऊ मुऱ्हेकर उपस्थित होते. तसेच शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी रामभाऊ कोलते, सचिव अनिल अंबुसकर, उपाध्यक्ष विजय अंबुसकर यांच्यासह राज्यभरातील क्रीडा अधिकारी व तांत्रिक पंचांची उपस्थिती होती.

स्पर्धेच्या प्रारंभी नांदुरा शहरातून खेळाडूंची भव्य रॅली काढण्यात आली, ज्याने शहरवासियांचे लक्ष वेधून घेतले. उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व स्व. खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय खेळाडू किरण अंबुसकर याने सर्व सहभागी खेळाडूंना क्रीडा शपथ दिली. महाराष्ट्रातील विविध विभागांतून सुमारे ५०० खेळाडू, संघ व्यवस्थापक आणि पंच सहभागी झाले आहेत. खेळाडूंसाठी प्रथमच वातानुकूलित () निवास व्यवस्था आणि उत्तम भोजनाची सोय करण्यात आली आहे, ज्याचे खेळाडू व पालकांनी कौतुक केले. आमदार चैनसुख संचेती यांनी या स्पर्धेसाठी स्थानिक विकास निधीतून ५ लाख रुपयांची मदत जाहीर केल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर यांनी प्रास्ताविकात स्पर्धेच्या आयोजनामागची भूमिका विषद केली. आदित्यकुमार सिंह आणि रॉकी डिसोजा यांनी खेळाडूंना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा अधिकारी रवींद्र धारपवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन विजय अंबुसकर यांनी मानले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी लक्ष्मीकांत यादव, मिलिंद काटोलकर, प्रशांत मंडले, संदीप केळे, डॉ. जीवन मोहोड आणि तेंग सु-डो असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले आहेत. ही स्पर्धा २५ मार्चपर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

# जिल्हा परिषद शाळांच्या नवपरिवर्तनासाठी झेप उपक्रमाची सुरुवात...

## शिक्षकांची उपक्रमशीलता म्हणजे सृजनशील संशोधन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा परिषद शिक्षकांची नाविन्यपूर्ण उपक्रमशीलता ही सृजनशील संशोधनाचेच एक रूप असून, या माध्यमातून आगामी शैक्षणिक सत्रात जिल्हा परिषद शाळांमध्ये आमूलाग्र बदल घडेल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी व्यक्त केला. समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा नियोजन सभागृहात झेप या अभिनव संकल्पनेतून जिल्ह्यातील १५० नाविन्यपूर्ण शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, शिक्षणाधिकारी डॉ. वैशाली ठग, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. मारुती गायकवाड, व्याख्याते गजानन राऊत, उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर, शेख अकिल आदी मान्यवर उपस्थित होते. गुलाब खरात पुढे म्हणाले की, जिल्हा परिषद शिक्षक विविध प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. मात्र या उपक्रमांना व्यापक व्यासपीठ मिळत नाही. झेप-उपक्रमाच्या माध्यमातून अशा उपक्रमांचे आदानप्रदान करून एका शाळेतील चांगले प्रयोग दुसऱ्या शाळेत पोहोचवण्याची व्यवस्था निर्माण केली जाणार आहे. प्रास्ताविकात प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी जिल्हा परिषद शाळांमध्ये सुरू असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला. प्रशासन शिक्षकस्नेही राहील, तर शिक्षकांनी विद्यार्थीस्नेही बनून शाळांचा पट वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ. जगराम भटकर यांनी मार्गदर्शन केले, तर गजानन राऊत यांनी प्रेरणादायी उद्बोधन केले. कार्यशाळेत निवडक शिक्षकांनी त्यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सूत्रसंचालन अरविंद शिंगाडे यांनी केले, तर आभार उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# बुलढाणा क्षय आरोग्यधाम येथे जागतिक क्षयरोग दिन उत्साहात साजरा

**जनसंचलन/ बुलढाणा**



जागतिक क्षयरोग दिनानिमित्त क्षय आरोग्यधाम, बुलढाणा येथील रुग्णालयात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. १९८२ पासून दरवर्षी २४ मार्च रोजी साजरा होणाऱ्या या दिनानिमित्त यंदाची ङ्कहोय! आम्ही क्षयरोगाचा अंत करू शकतो : देशांच्या नेतृत्वाखाली लोकांच्या मदतीनेफ्फ ही संकल्पना प्रभावीपणे मांडण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुशील चव्हाण यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व डॉ. रॉबर्ट कोच यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. एच. आर. खान यांनी क्षयरुग्णांची सद्यस्थिती, आकडेवारी तसेच शासनाकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात रुग्णालयाचे वरिष्ठ लिपिक दत्तात्रय वाघमारे यांनी क्षयरुग्णांवरील स्वरचित कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. आहार तज्ञ डॉ. मयुरी देशमुख यांनी रुग्णांना प्रथिनयुक्त आहाराचे महत्त्व समजावून सांगत योग्य आहाराचे मार्गदर्शन केले. यावेळी क्षयरोगावर मात केलेल्या रुग्णाची प्रेरणादायी व्हिडिओ क्लिपही दाखविण्यात आली. याशिवाय, परिसेविका मीना जोंधळे यांच्या वतीने प्रोटीन पावडर तसेच अधिपरिचारिका सोनाली दाबेराव यांच्या वतीने एनर्जी ड्रिंकचे रुग्णांना वाटप करण्यात आले. डॉ. सुशील चव्हाण यांनी क्षयरोगाविरुद्ध लढण्यासाठी रुग्णांना सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कालिंदा जायभाये यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रामनंदन चव्हाण यांच्यासह सर्व कर्मचारीवर्गाने परिश्रम घेतले. यावेळी डॉ. आनंद कोठारी व डॉ. मोहिनी खेडेकर यांचीही उपस्थिती होती.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आशियाई लेक्रॉस स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघाचा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडून सत्कार



जनसंचलन/बुलढाणा

सौदी अरेबियातील रियाध येथे संपन्न झालेल्या आशियाई लेक्रॉस स्पर्धेत (  ) अजिंक्यपद मिळवून देशाचा तिरंगा फडकवणाऱ्या भारतीय संघाचा आज केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी गौरव केला. नवी दिल्ली येथील त्यांच्या शासकीय निवासस्थानी हा सत्कार सोहळा पार पडला. भारताची ऐतिहासिक कामगिरी

सौदी अरेबियातील रियाध येथे १ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान आशियाई लेक्रॉस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने इराकविरुद्ध ९-२ अशा मोठ्या फरकाने विजय मिळवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या संघात देशभरातील १८ गुणवंत खेळाडूंचा समावेश होता. विजेत्या संघाला आपल्या दिल्ली येथील निवासस्थानी आमंत्रित करून प्रतापराव जाधव यांनी सर्व खेळाडूंशी जिव्हाळ्याने संवाद साधला. यावेळी त्यांनी खेळाडूंच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे कौतुक केले. याप्रसंगी बोलताना प्रतापराव जाधव म्हणाले की, आज भारत देश सर्वच क्षेत्रांत जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवत आहे. खेळ क्षेत्रात तुम्ही केलेली ही कामगिरी भारतीयांसाठी अत्यंत अभिमानास्पद आणि बहुमोलाची आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव रोशन करणाऱ्या तुमच्यासारख्या खेळाडूंमुळेच भारताची मान उंचावते. केंद्रीय मंत्र्यांनी यावेळी संपूर्ण संघाचे अभिनंदन करून त्यांना भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सुवर्णपदक विजेत्या या संघात विविध राज्यांतील खेळाडूंचा समावेश असून, त्यांच्या या यशाबद्दल देशभरातून कौतुक होत आहे

# बुलढाणा जिल्हा परिषदेचा ४१.२३ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर




जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा परिषद बुलढाणा यांचा सन २०२५-२६ चा सुधारित व सन २०२६-२७ चा रु. ४१ कोटी २३ लाखांचा मूळ अर्थसंकल्प सामान्य सभेत मंजूर करण्यात आला. मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड यांनी अर्थसंकल्प सादर केला असून मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक गुलाबराव खरात यांनी त्यास मंजुरी दिली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब मोहन, प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) कोल्हे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, शिवशंकर भारसाकळे, प्रमोद एंडोले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते, जिल्हा कृषी विकास अधिकारी अंगाईत, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. हा अर्थसंकल्प मुद्रांक शुल्क अनुदान, जमीन महसूल अनुदान, गुंतवणुकीवरील व्याज व इतर उत्पन्न यांचा विचार करून तयार करण्यात आला असून, जिल्हा परिषदेच्या गुंतवणुकीवरील व्याजातून उत्पन्नात वाढ झाल्याने यंदाचा अर्थसंकल्प वाढीव आहे. शासन नियमांनुसार खर्चात समाज कल्याणासाठी २० टक्के, महिला व बाल कल्याणासाठी १० टक्के, देखभाल-दुरुस्ती २० टक्के, दिव्यांग कल्याण ५ टक्के, शाळा दुरुस्ती ५ टक्के, समृद्ध पंचायत अभियान १० टक्के व ई-गव्हर्नन्ससाठी ०.५ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

# शिक्षक मतदारामध्ये माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षकांना संधी द्यावी..अमरावती शिक्षक मतदार यादीतील संभ्रम दूर करा- डी एस लहाने !

जनसंचलन/बुलढाणा

अमरावती शिक्षक मतदार यादी तयार करण्याचे काम सुरू आहे.मात्र यादीत मध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम आहे. तो दूर करण्यात यावा व माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षकांना मतदानाची संधी द्यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सह संपर्कप्रमुख प्रा. डी एस लहाने यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. याबाबत आज जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले की, अमरावती विभाग शिक्षक मतदार संघामध्ये मतदार नोंदणी करून यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. भारत निर्वाचन आयोगाच्या पत्रामधील १.३.२ मधील तरतुदीमध्ये माध्यमिक शाळेचा उल्लेख आहे.मात्र माध्यमिक शिक्षकांचा नाही. त्यामुळे माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक पात्र असावे.आजपर्यंत झालेल्या शिक्षक मतदार संघात माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक मतदार म्हणून पात्र



धरले होते.माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षकांनी आजपर्यंत सदर मतदार संघात मतदान केलेले आहे. आज रोजी अमरावती मतदार संघाच्या नोंदणीमध्ये सुध्दा अनेक ठिकाणी सर्व शिक्षकांची नोंदणी झालेली आहे.परंतु काही जिल्ह्यांमध्ये विशेषतः बुलडाणा जिल्ह्यात नव्याने माध्यमिक शाळेतील ९, १० व ११ वी, १२ वी ला शिकविणाऱ्या शिक्षकांचीच नोंदणी करण्याचे निर्देश दिल्या गेले आहे. तसेच शासनमान्य सेल्फ फायनान्स च्या शाळा व इतर टेक्नीकल संस्था, विनाअनुदानित महाविद्यालये, विनाअनुदानित अपंग/मुकबधीर/ शाळा, मतिमंद शाळा येथील कार्यरत शिक्षकांना शिक्षणाधिकारी यांचे अँप्रूव्हल नसते. संस्था स्तरावर ते कार्यरत असतात. त्यांची सुध्दा मतदार म्हणून नोंदणी होणे आवश्यक आहे. अनेक तालुक्यात त्याची नोंदणी करण्यासाठी प्रशासनाने नकार दर्शविला आहे. तरी अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातील मतदार नोंदणी मधील हे संभ्रम तात्काळ दूर करावे, जेणेकरून कोणतेही शिक्षक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही. अशी मागणी करण्यात आली. यावेळी प्रा लहाने यांच्यासह प्रमोद पवार, सुरेश काळे दौलत नरवाडे, बबनराव पवार राजेंद्र शिरसाठ महेश जवळ संजय शिंदे,गौरव देशमुख,अतिश्वर भोरकर, प्रमोद मोहरकर,सुनिल दाभाडकर स्वप्निल काकडे आदी उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८